मुंबईतील म्हाडा वसाहतीतील गृहनिर्माण संस्थांमधील रहिवाशांच्या थकीत भूईभाडे, अकृषिकर आणि सेवाकराबाबत मा.विधीमंडळ सदस्यांची समिती गठित करणेबाबत

महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग
शासन निर्णय क्रमांक : लवेसू- २०१८/प्र.क्र.१०९/गृनिप
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई
दिनांक : २७ मार्च, २०१८

प्रस्तावना-

मुंबईतील म्हाडा वसाहतीतील गृहनिर्माण संस्थांमधील रहिवाशांचे थकीत भूईभाडे, अकृषिकर आणि सेवाकराबाबत विधानपरिषदेत उपस्थित करण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनेवर दि. ७.०३.२०१८ रोजी झालेल्या चर्चेच्या वेळी मा. मंत्री, गृहनिर्माण यांनी “दोन्ही सभागृहातील ठरावीक ८ ते १० सदस्यांची एक सर्व पक्षीय समिती बनवून त्या समितीमध्ये जे ठरेल त्याची पुढीलवेळी अंमलबजावणी करु.” असे आश्वासन दिले आहे. या आश्वासनाच्या अनुषंगाने समिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. आता या संदर्भात शासनाने मा. मंत्री, गृहनिर्माण यांचे अध्यक्षतेखाली समिती गठित करण्याचा निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:-

मुंबईमधील म्हाडा वसाहतीतील गृहनिर्माण संस्थांमधील रहिवाशांकडील थकीत भूईभाडे, अकृषिकर आणि सेवाकराबाबतच्या प्रलंबित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी मा.मंत्री, गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे:-

अ.क्र.	सदस्याचे नाव	पद
१	श्री.प्रकाश महेता, मा. मंत्री (गृहनिर्माण)	अध्यक्ष
२	श्री.रविंद्र वायकर, मा. राज्यमंत्री (गृहनिर्माण)	सदस्य

३	श्रीमती विद्या ठाकूर, मा. राज्यमंत्री (महिला व बाल विकास)	सदस्य
४	श्री. अमित साटम, विधानसभा सदस्य	सदस्य
५	ॲड . आशिष शेलार, विधानसभा सदस्य	सदस्य
६	श्री.सुनिल राऊत, विधानसभा सदस्य	सदस्य
७	श्री.सुनिल प्रभू, विधानसभा सदस्य	सदस्य
८	श्री.पराग अळवणी, विधानसभा सदस्य	सदस्य
९	श्री.मंगेश कुडाळकर, विधानसभा सदस्य	सदस्य
१०	श्री.अस्लम शेख, विधानसभा सदस्य	सदस्य
११	श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, विधानपरिषद सदस्य	सदस्य
१२	ॲड.अनिल दत्ताराम परब, विधानपरिषद सदस्य	सदस्य
१३	श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, विधानपरिषद सदस्य	सदस्य
१४	श्री. किरण पावसकर, विधानपरिषद सदस्य	सदस्य
१५	अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग	सदस्य सचिव
१६	उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण	निमंत्रित सदस्य

उपरोक्त समितीने मुंबईमधील म्हाडा वसाहतीतील गृहनिर्माण संस्थांमधील रहिवाशांच्या थकीत भूईभाडे, अकृषिकर आणि सेवाकराबाबतच्या प्रलंबित प्रश्नांवर साकल्याने विचारविमर्श करुन त्या संदर्भातील शिफारशी / अहवाल शासनास एक महिन्याच्या कालावधीमध्ये सादर करण्यात यावा.

प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०३२७१७३४१९४००९ असा आहे. प्रस्तुत शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Manohar Ramchandra Parkar

Digitally signed by Manohar Ramchandra Parkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Housing Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c4c0810e9c94cf92d42a36d93c8f7b6ac18542c1ee758c9cfddcea906d9cf544, serialNumber=fb43688343316856c0f7e793462127aa87fce45724e87929c6889798cd7d2c62, cn=Manohar Ramchandra Parkar
Date: 2018.03.27 17:35:28 +05'30'

(म. रा. पारकर)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई-३५.

२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

३) मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/ विधानपरिषद, विधानभवन, मुंबई-३२.

४) मा. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य.

५) मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२.

६) मा. राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२.

७) मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई-३२.

८) महालेखापाल, महाराष्ट्र - १, मुंबई (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परिक्षा).

९) महालेखापाल, महाराष्ट्र - २, नागपूर (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परिक्षा).

१०) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.

११) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई-०१.

१२) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई-५१.

१३) गृहनिर्माण विभागातील उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी.

१४) निवड नस्ती - गृनिप.